रजि. नं. : ई–६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी – ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१–२४२३–२५८ ५०० फॅक्स : +९१–२४२३–२५८ ८७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/वशी/साभनि/ ४४०८ /२०२६
दिनांक :- - 9 FEB 2026

प्रति,
------------------------
------------------------
------------------------

विषय:- सन २०२६-२०२७ करीता साईबाबा भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान या दोन विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी दरपत्रक मागविणेत येत असलेबाबत..

वरील विषयान्वये, सन २०२६-२०२७ (दि.०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७) या एक वर्ष कालावधीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान या दोन विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी खालील अटी/शर्तीस अधीन राहून दरपत्रके मागविणेत येत आहे.

०१) साईबाबा भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान या ठिकाणी पेस्ट कंट्रोल करणेचा कालावधी दि.०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ असा एक वर्षाचा राहील.

०२) साईबाबा भक्तनिवासस्थान - १,७३,२६८.०० चौ.फुट व साईप्रसाद निवासस्थान- ८२,६१३.६६ चौ.फुट या दोन विभागाचे इमारती व परिसराचे एकूण क्षेत्रफळ २,५५,८८१.६६ चौ.फुट इतके आहे.

०३) दरपत्रक सादर करतांना प्रती चौ.फुट प्रमाणे खालील तक्त्यात दर्शविलेनुसार दि.२१ /०२/२०२६ रोजी सायं ०४.०० वा पर्यंत संस्थानचे आवक विभागात सादर करावेत. यानंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

| साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ | साईप्रसाद निवासस्थान इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ | एकूण क्षेत्रफळ | फवारणीचा दर प्रती चौरस फुटास (GST) वगळून | वर्षातून सहा फवारणीसाठी एकूण होणारी रक्कम रुपये GST वगळून रु. (४ x ५ नुसार) |
|---|---|---|---|---|
| १२ | २ | ३ | ४ | ५ |
| १,७३,२६८.०० चौ.फुट | ८२,६१३.६६ चौ.फुट | २,५५,८८१.६६ चौ.फुट | | |
| | | | एकूण रक्कम रुपये | |

०४) दरपत्रक सादर करणा-या ठेकेदार/कंपनीकडे GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑन लाईन GSTक्रमांक पावती तसेच Licensing Authority चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

०५) दुकान निरीक्षक यांचा नोंदणीकृत दाखला व स्वतःचे/कंपनीचे पॅन कार्ड असणे आवश्यक आहे.

०६) खालील प्रमाणे कोणतेही एक मान्यता प्राप्त ऑपरेटर ट्रेनिंगचे प्रमाणपत्र असणे आवश्यक.

अ) Central Food Technological Research Institute अथवा

आ) Technical Training For PMPs अथवा

इ) Storage Pest Management & Fumigation ( भारतीय अनाज संचयन संस्थान चे Indian Grain Storage Institute प्रमाणपत्र ) अथवा

ई) The Pest Management Course कोणत्याही मान्यताप्राप्त Institute चे

वरील कागदपत्रे दरपत्रक सादर करतांना सोबत जोडणे बंधनकारक आहे. ज्या दरपत्रकधारकांनी सदरची कागदपत्रे सोबत जोडली नसेल त्याचे दरपत्रक रद्द करणेत येईल.

मागील पानावर...

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४
दुरध्वनी +९१–२२–२४१६६५५६, फॅक्स : +९१–२२–२४१५०७९८, टेलिग्राम : साईनिकेतन मुंबई
website : ▪ http://www.shrisaibabasansthan.org ▪ http://www.sai.org.in
E_mail : ▪ saibaba@shrisaibabasansthan.org.in ▪ saibaba@sai.org.in

७) याकामी संस्थानकडून अग्रीम(अॅडव्हान्स) रक्कम दिली जाणार नाही.

८) सदर इमारतीमध्ये कोणत्याही किटकांचा एक वर्षाचे कालावधीत उपद्रव होणार नाही यासाठी प्रतीबंधात्मक प्रभावी उपाय योजना करणेबाबतची सर्वस्वी जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

९) पेस्ट कंट्रोल (औषध फवारणीचे) काम ठरलेल्या वेळेत करण्यात येत नसेल, कामात चाल ढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर संस्थान कोणतीही पुर्व सुचना न देता प्रस्तुत कामाचा करार रद्द करेल. तसेच मंजुर दरपत्रकधारक/कंपनीस तीन वर्षासाठी काळया **(Black List)** यादीत टाकणेत येईल.

१०) पेस्ट कंट्रोल/औषध फवारणीसाठी लागणारे औषध, पंप वगैरे साहीत्य व कामगार मंजुर दरपत्रकधारक यांनी स्व:खर्चाने पुरवावयाचे आहेत.

११) पेस्ट कंट्रोल कामी नियुक्त केलेल्या कामगारांचे जाणे/येण्याचा खर्च तसेच चहा पाणी/जेवण/नाष्टा/राहाणेचा वगैरे सर्व खर्च मंजुर दरपत्रकधारक यांनी स्वत: करावयाचा आहे.

१२) पेस्ट कंट्रोल कामासाठी दरपत्रकधारक यांनी नियुक्त केलेल्या कामगारांना कोणत्याही प्रकारची विषबाधा अगर इतर कारणास्तव काही त्रास झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मंजुर दरपत्रक धारक यांची राहील. त्यास कोणत्याही प्रकारे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी जबाबदार राहणार नाही.

१३) पेस्ट कंट्रोल कामी मंजुर दरपत्रकधारक यांनी नियुक्त केलेल्या कर्मचा-यास किमान वेतन दराने कामगारांचे वेतन/भविष्य निर्वाह निधी **(PF)** व कर्मचारी राज्य विमा **(ESIC)**, आयकर वगैरे सर्व कायदेशीर बाबींची जबाबदारी मंजुर दरपत्रकधारक यांची राहील. त्यास कोणत्याही प्रकारे संस्थान जबाबदार राहणार नाही.

१४) प्रत्येक औषध फवारणीचे वेळी संस्थान अधिकारी/कर्मचारी यांचे समक्ष पेस्ट कंट्रोल करुन द्यावी लागेल.

१५) दरपत्रकधारक यांनी ढेकूण,झुरळे अथवा इतर किटकांच्या प्रादुर्भावाची तक्रार आल्यास ती त्वरीत निवारण करण्याची तजवीज करण्यात यावी.

१६) एक वर्षाचे कालावधी मध्ये पेस्ट कंट्रोलच्या ६ फवारण्या करणे आवश्यक आहे. प्रत्येक औषध फवारणी नंतर ज्या-त्या विभागाचे झालेल्या कामाचे मंजुर दराने होणा-या रक्कमे इतके बील दरपत्रकधारक यांनी साईबाबा भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे सादर करावे.

१७) एका रुम/हॉल मधील औषध फवारणी करतांना त्यामधील सर्व फर्निचर, गाद्या, उश्या, टेबल, खुर्च्या, लॉकर, फडताळ, टॉयलेट, बाथरुम व सर्व चारही बाजुच्या भिंती, भुभाग, छत इत्यादीचा समावेश राहील. बील हे चटई क्षेत्राचे मोजमापा प्रमाणे दरपत्रकधारक यांना संस्थानकडून आदा केले जाईल.

१८) नमुद केलेल्या एक वर्षाचे कालावधीमध्ये प्रती २ महिन्या नंतर एक फवारणी (पेस्ट कंट्रोल) अशा एकूण ६ फवारण्या करणे दरपत्रकधारक यांचेवर बंधनकारक राहील. जेवढया फवारण्या प्रत्यक्ष केल्या जातील त्याचीच रक्कम साईबाबा भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान यांचे मार्फत अदा करण्यात येईल.

१९) एक वर्षाचे करार कालावधीत कोणत्याही कारणासाठी अथवा सबबी वर दर वाढ मिळणार नाही. निश्चित केलेल्या दरानेच पेस्ट कंट्रोलचे काम करावे लागेल.

२०) पेस्ट कंट्रोलचे कामी आपण नियुक्त केलेल्या कामगारांना कोणत्याही कारणास्तव दुखापत/अपघात झाल्यास कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ नुसार, भरपाई द्यावयाची झाल्यास ती जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

२१) पेस्ट कंट्रोल कामासाठी शासन नियमाप्रमाणे वेळोवेळी लागू होणा-या दरानुसार **GST** रक्कम संस्थानमार्फत देण्यात येईल. बीलामध्ये **GST** रक्कम स्वतंत्र नमुद करावी. सदर रक्कम शासनाकडे विहीत मुदतीत भरणा करुन त्याचे चलन व अनुषंगिक कागदपत्रे पुढील बीलाबरोबर सादर करावीत. याबाबत संपूर्ण कायदेशीर जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

**पुढील पानावर...**

२२) आयकर कायदा, **GST** कायदा इत्यादी नुसार वेळोवेळी मुळ बिलातून **TDS, GST** इत्यादी वजावट करुन बिलांची रक्कम अदा करण्यात येईल.

२३) आपण नियुक्त केलेल्या कामगारांचे संबंधीत कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन अॅण्ड अॅबॅलिशन) अॅक्ट १९७० नुसार हजेरी रजिस्टर, वेतन पत्रके वगैरे अनुषंगिक कागदपत्रे विहीत नमुन्यात ठेवणे तसेच सदरचे कायद्यानुसार त्याची पुर्तता करणे ही संपुर्ण जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

२४) साईबाबा भक्तनिवासस्थान व साईप्रसाद निवासस्थान या दोन इमारतीच्या सभोवतालच्या परिसरात ड्रेनेज/ चेंबर्स या ठिकाणी पेस्ट कंट्रोल करावे लागणार आहे.

२५) पेस्ट कंट्रोल करणे कामी **Central Insecticide Board** चे **Approve** केलेले **(House Hold)** औषधे वापरणे दरपत्रकधारक यांचेवर बंधनकारक राहील.

२६) कोणत्याही कारणास्तव काम बंद करता येणार नाही. परंतु काम बंद करावयाचे असल्यास दरपत्रकधारक यांनी संस्थानला ०४ महिने अगोदर पुर्व सूचना देणे बंधनकारक राहील.

२७) दरपत्रकधारक यांनी कामास नेमलेले कर्मचा-यांना ओळखपत्र, गणवेष वगैरे तदनुषंगीक सुविधा देणे बंधनकारक आहे.

२८) संस्थानकडून दरपत्रकधारक यांना पेस्ट कंट्रोलची औषधे, साहीत्य ठेवणे कामी करार कालावधीत एक स्टोअर रुम मोफत देण्यात येईल.

२९) दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती मान्य असले बाबतचा रितसर करारनामा रु.६००/- रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर नोटरी किंवा सब रजिस्ट्रार यांचे समोर करुन द्यावा लागेल व त्यासाठी येणारा सर्व खर्च स्वत: करावयाचा आहे.

३०) नविन ठेकेदाराला पुढील कार्यादेश पारित होऊन नविन ठेकेदाराने काम सुरु करेपर्यंत आहे त्याच मंजुर दरात काम करुन देणे कोटेशनधारकावर बंधनकारक राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही अथवा तशी मागणी करता येणार नाही.

३१) पेस्ट कंट्रोल केल्यानंतर ढेकूण, झुरळ तसेच इतर किटकांचा नाश झालेला नाही अगर जिवंत असल्याचे दिसून आल्यास स्वखर्चाने पुन:श्च तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करुन द्यावी लागेल.

३२) कोणतेही कारण न देता, सदरहु दरपत्रक स्थगित करणेचा किंवा रद्द करणेचा किंवा उपरोक्त अटी-शर्तीमध्ये वाढ वा घट वा बदल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे.

३३) सदरहु अटी/शर्ती अथवा करारनाम्यात नमूद नसलेल्या मुद्यांबाबत काही वाद उपस्थित झाल्यास त्याबाबत संस्थान प्रशासन यांचा निर्णय अंतीम राहील.

३४) सदर अटी व शर्ती या करारनाम्याचा भाग समजण्यात येईल.

३५) सदरच्या व्यवहाराबाबत काही वाद उपस्थित झाल्यास कोर्ट कारवाई करणे भाग पडल्यास उभय पक्षकारांना सदरचा वाद हा मे.सिव्हील जज्ज, ज्युनिअर डिव्हीजन / मे.सिव्हील जज्ज,सिनिअर डिव्हीजन राहाता व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ छत्रपती संभाजीनगर, या न्यायालयाचे अधिकार कक्षेतच उपस्थित करता येईल, त्याशिवाय इतर कोणत्याही कोर्टात दावा दाखल करता येणार नाही.

**कळावे. श्री साईबाबांचे शुभाशिर्वादासह !**

Digitally signed by
Bhimraj Ramrao Darade
Date: 06-02-2026

(भिमराज दराडे)

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी**